ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील वर्धा शहरातील महिलांचे योगदान– एक ऐतिहासिक अध्ययन

प्रा.डॉ.राजू भा. खरडे.
आर.बी.व्यास कला वाणिज्य महाविद्यालय, कोंढाळी, जिल्हा – नागपूर .

प्रस्तावना :

विदर्भातील इतर शहराप्रमाणे वर्धा जिल्ह्यासह, वर्धा शहराने भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात उत्सफूर्तपणे भाग घेतला. लोकमान्य टिळकांच्या प्रचार दौऱ्याने वर्धा शहरासह, जिल्हयात प्रचंड राजकीय जागृती घडून आली होती. महात्मा गांधीच्या हाती कॉंग्रेसची धुरा येताच, त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे एक नवचैतन्य संपूर्ण भारतात निर्माण झाले. कॉंग्रेसची अधिवेशने नागपूर आणि अमरावतीला झाल्याने विदर्भात राजकीय जागृती होण्यास मोठी मदत झाली. दांडी यात्रेनंतर तर महात्मा गांधीचे वास्तव्य वर्धा शहराजवळील सेवाग्रामला होते. याच ठिकाणाहून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाची सर्व सुत्रे चालत असल्याने, वर्धा शहराला फार महत्त्व प्राप्त झाले. महात्मा गांधीच्या सर्व आंदोलनामध्ये वर्धा शहरातील पुरुषांबरोबर स्त्रियांनीही मोठ्या प्रमाणात भाग घेतला. त्यांच्या कार्याला उजाळा मिळावा म्हणून शोधनिबंधासाठी ह्या विषयाची निवड करण्यात आली.

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रसचे १९२० चे अधिवेशन नागपूरला झाल्यापासून वर्धा येथील जमनालाल बजाज व त्यांची पत्नी जानकीदेवी बजाज ह्यांनी स्वत:ला राष्ट्रीय कार्याला वाहून घेतले.[१] या अधिवेशनात १६९ महिला सहभागी झाल्या होत्या त्यात जानकीदेवी बजाज, शांताबाई काळे या वर्धा जिल्हयातील महिला सुध्दा होत्या. त्यामुळे वर्धा शहरातील राष्ट्रीय चळवळीला जोम आला.[२] वर्धा शहरातील जानकीदेवी बजाज यांनी देवळी येथे ३ एप्रिल १९२१ रोजी असहकार व स्वदेशीवर भाषण करताच, भाषणाने प्रभावित होऊन, सभेला उपस्थित असणाऱ्या काही स्त्रियांनी आपल्या हातातील विदेशी बांगड्या फोडल्यात.[३] भागवतीदेवी यांनी चरखा व खादीच्या प्रचारासाठी विदर्भात दौरे करून प्रचार केला. पोलीस अहवालातील नोंदीवरून २९ मे रोजी वर्धा येथील जाहीर सभेत पुरुषांबारोबर भाषण करणाऱ्यामध्ये भागवतीदेवी हया महिला होत्या असे दिसून येते. तसेच मुळशी सत्याग्रहात सहभागी होण्यासाठी वर्धेच्या सत्यभामाबाई गेल्या होत्या.[४]

विलेपार्ले छावणीतील जानकीदेवी बजाजांचे प्रचारकार्य :

१९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी मुंबई प्रातांची जबाबदारी जमनालाल हयांच्यावर महात्मा गांधी यांनी सोपवताच त्यांच्या पत्नी जानकीदेवी बजाज ह्या सुध्दा कस्तुरबा गांधी यांच्या सोबत काम करण्यासाठी मुंबईच्या विलेपार्ले छावणीत दाखल झाल्या.[५] विलेपार्ले छावणीत जून १९३० ला १४४ पुरुष तर १६४ महिला होत्या. जुहू आणि विलेपार्ले येथे समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करून ६ एप्रिलला कायदेभंगाच्या चळवळीला सुरूवातझाली. जानकीदेवी ह्या भागात दारु विरोधनाचे काम केले. त्यासाठी त्यांनी ठिकठिकाणी सभा घेतल्या वक्ते व कार्यकर्ते पकडले जात होते आणि त्या जागी नविन वक्ते तयार होत होते. सरोजीनीदेवीच्या नेतृत्वाखाली धारासना मीठागारावर स्वयंसेवकांनी हल्ला केला असता, पोलीसांनी केलेल्या लाठीहल्यात सत्याग्रही जमिनीवर कोसळत असतांना ज्याला जे सुचेल ते सत्याग्रही करीत होत. या हल्ल्यात अनेक सत्याग्रही बेशुध्द झाले असतांना, जानकीदेवी यांनी ओल्या कपड्याने त्यांच्या डोळ्यावर पाणी शिंपडले. धारासनाच्या हया धुमश्चक्रीत जानकीदेवी मागे न हटता जखमींची सेवा करीत होत्या. विलेपार्ले छावणी जप्त झाल्यावर अटक होऊ नये, म्हणून जानकीदेवी वर्धेला आल्या.[६] कारण त्यांना स्वातंत्र्य आंदोलनाला बळकटी आणण्यासाठी प्रचारकार्य व राष्ट्रसेवा करायची होती. वर्धेला आल्यावर जानकीदेवींनी जनतेत उत्साह

निर्माण करण्यासाठी गंगूबाई भुसारी व शांताबाई यांच्याबरोबर जोरदार दौरे करून प्रचार कार्य केले. वर्धा जिल्हयात त्यांनी १९३० च्या ऑक्टोंबर महिन्यात एका आठवड्यात १८ प्रचार सभा घेऊन जनतेत राष्ट्रीय जागृती निर्माण करण्याचा जोरदार प्रयत्न केला.[७]

वर्धा येथे मांजरसेनेची स्थापना :

वर्धा येथे वानरसेनेच्या धर्तीवर मुलींची मांजर सेना स्थापन करण्यात आली.[८] या मांजर सेनेचा नारा म्यांव–म्यांव असा होता. मांजरसेनेच्या मुली निरनिराळया प्रकारची निरोधने करणे, कॉंग्रेसची पत्रके वाटणे, मिरवणूका व प्रभात फेऱ्या काढणे अशा प्रकारची कामे करीत असत. वर्धेला शिरगीणतीचा बहिष्कार दिन पाळण्यात आला. जंगी मिरवणूक काढण्यात आली, या मिरवणूकीत जानकीदेवी बजाज आपल्या मुलीसह सहभागी झाल्या होत्या.[९]

कायदेभंगाची चळवळ १९३२ (दुसरी) :

गांधी इर्विन करार संपुष्टात येताच, दुसऱ्यांदा कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात होताच सरकारने दडपशाही करत एकामागे एक संस्था अवेध घोषित करीत बंद केल्या. वर्धा शहरात ६ जानेवारी १९३२ रोजी एक सभा घेण्यात आली. या सभेत जानकीदेवी बजाज व विमलाबाई भावे हयांची भाषणे झाली. विदेशी वस्तूंवर बहिष्कार, कॉंग्रेस सदस्यांची नोंदणी आणि कॉंग्रेसने पास केलेल्या प्रस्तावांची अंमलबजावणी ह्या विषयावर भाषणे दिली. वर्धेच्या सत्याग्रह आश्रमातील महिलांनीही चळवळीत भाग घेतला होता.[१०]

देवळीला ४ फेब्रुवारी १९३२ रोजी ७००० लोकांनी सभा झाली. त्यात ४००० महिला होत्या. तर सभेला जानकीदेवी बजाज यांनी संबोधीत केले. पुलगांवला जानकीदेवी बजाज यांनी सत्याग्रहाकरीता छावण्या उघडून त्यांना मार्गदर्शन केले. त्या प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या महिलांची तुकडी तयार करीत होत्या. एक खाजगी सभा चंद्राताई हयांच्या घरी घेण्यात आली. महिलांनी विदेशी कापड्याच्या व्यापाऱ्याकडून विदेशी कापड विकणार नाही असे लिहून घेतले. वर्धा शहरात १० फेब्रुवारीला हरताळ पाळण्यात आला. दारुच्या दुकानावर विरोधने करण्यात आली. अनेकांनी स्फूर्तीदायक भाषणे दिली. १७ फेब्रुवारीला वर्धा शहरात ५००० लोकांची मिरवणूक निघाली असता, मॅजिस्ट्रेट डोंगरे यांनी जनतेला पागविण्याचा पोलीसांना हुकूम दिला. पण जनतेने पोलीसांचा हुकूम न मानल्यानेपोलीसांनी लाठीमार केला असता १७ स्त्रिया, २ मुली आणि ५५ पुरुष जखमी झाले. तर १८ जणांना जागीच अटक करण्यात आली. मात्र लक्ष्मीबाई व तेजराम हे दोघेही पोलीस पोहचण्याच्या पूर्वी भूमिगत झाले. १९३० पेक्षा १९३२ चे सविनय कायदेभंग आंदोलन अधिक तिव्र होता.[११] १९३० च्या चळवळीत वर्धा शहरासह जिल्हयातील ५० महिलांना कारागृहाची शिक्षा झाली होती.[१२]

जानकीदेवी बजाजांचे वर्धा जिल्ह्यातील प्रचार कार्य :

जानकीदेवी बजाज ह्यांच्या अविरत प्रचार कार्यामुळे चळवळीचा जोर पुलगांव, आर्वी, देवळी ह्या शहरी भागातही वाढत होता. १५ फेब्रुवारीला सिंदीला झालेल्या ३०० लोकांच्या सभेत वल्लभभाई सोबत जानकीदेवी यांचेही भाषण झाले. १८ फेब्रुवारी १९३२ रोजी वर्धा शहरात २१ जानेवारी ला ८०० लोकांसमोर केलेल्या भाषणाकरीता जानकीदेवींना इन्स्पेक्टर अली अख्तर ने त्यांच्या घरीच गुपचुप अटक केली. कुणालाही जानकीदेवी बजाज ह्यांच्या अटकेची माहिती होऊ न देता, त्यांना तुरुंगात नेण्यात आले.[१३] त्याचदिवशी लक्ष्मीबाई केवलेंनी ५०० लोकांची मिरवणूक दारु दुकानाजवळून जाणारा रस्ता टाळून काढली यावेळी ४०० लोकांना अटक झाली त्यात मुलेच जास्त होते. जानकीदेवीच्या अटकेमुळे वर्धा शहरातील परिस्थितीत पूर्ण बदलली, चळवळीच्या प्रचार कार्यात शिथिलता आली आणि वर्धा शहरात कायदेभंगाची चळवळ फेब्रुवारी महिन्यात थंडावली.[१४]

वैयक्तिक चळवळ :

बजाज परिवाराने देशकार्यासाठी व स्वातंत्र्यासाठी केलेल्या महान योगदानामुळे वर्धा शहर स्वातंत्र्य आंदोलनाचे तिथक्षेत्र बनले होते.[१५] १७ ऑगस्ट १९३५ ला जवाहरलाल नेहरु यांनी वर्धेच्या महिला आश्रमाला भेट दिली असता, जमनालालजींनी महिला आश्रमाचा इतिहास सांगितला. महिला आश्रमातील विद्यार्थीनींना आश्रम सोडून गेल्यावर सामाजिक परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने कार्य करण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घालावे, असा मोलाचा उपदेश केला. आश्रमातील शिक्षिका कमलाताई लेलेनीं स्वत: हाताने विणलेले कापड, जवाहरलालजींना भेट म्हणून दिले.[१६] पहिले व्यक्तीत सत्याग्रही म्हणून गांधीजींनी विनोबा भावेंची निवड केली. [१७]१७ आक्टोबर १९४० रोजी गुरूवारला सकाळी ८ वाजता पवणारला युध्द विरोधी भाषण करून विनोबा भावेंनी वैयक्तीक सत्याग्रहाचा शुभारंभ केला. पाऊस पडत असतांनाही ३०० लोक सभेला उपस्थित होते. जमनालालजी वर्धा महिला आश्रमातील ५० विद्यार्थीनीसह या सभेला उपस्थित होते. विद्यार्थीनींनी खादीचा हार अर्पन करून सभास्थळी विनोबाजींचे स्वागत केले.[१८]स्वातंत्र्य

आंदोलनात स्त्रियांचा वाटा वाढावा ह्यासाठी गांधीजी प्रयत्नशील होते. स्वातंत्र्य लढ्यात त्यागाचे दर्शन होतच होत, पण त्याग म्हणजे दारिद्रय नव्हे, ती एक मनाची शक्ती व जीवनाची वृत्ती आहे हे स्त्रियांच्या मनावरही बिंबविले जाऊ लागले. गांधीजींनी वर्धा येथील शरयुताई धोत्रे व दमयंतीताई धर्माधिकारी यांची पहिल्या महिला सत्याग्रही म्हणून निवड केली. १० जानेवारी १९४१ रोजी दमयंती धर्माधिकारी हयांनी वर्धा येथे युध्द विरोधी भाषण दिले त्यावेळी ५० लोक उपस्थित होते. तर दमयंतीताई यांनी चार खेडयांना भेटी देऊन, राष्ट्रीय जागृती केली. परंतू कुणालाही अटक झाली नाही.[१९] गांधीजींनी सौ शरयुताई धोत्रे, सौ. दमयंतीबाई धर्माधिकारी यांना वैयक्तीक सत्याग्रहाची परवानगी दिली होती. त्यांना महिन्यातून फक्त तीन दिवसच घरी राहायचे, बाकी दिवस प्रचार कार्य करायचे. या दोघी ८० दिवस सतत प्रचार करीत होत्या. या महिला प्रत्येक घरात चुलीपर्यंत जाऊन पोहचत. त्यांनी दोन महिन्यात २० वर्षापेक्षा जास्त माहिती गोळा केली होती.[२०]

१० जानेवारीला वर्धा येथे मिरवणूक काढून शरयुताई धोत्रे यांनी सभा घेतली. त्यांनी जनतेला विनंती केली की, जनतेने कॉग्रेसचा कार्यक्रम राबवून विदेशी सरकारला पंगू बनवावे. यावेळी शरयूताई धोत्रे यांना अटक करण्यात आली. परंतू त्यांच्या घराची झडती घेतली असता, कोणतीही आक्षेपार्य कागदपत्रे न सापडल्याने त्यांना सोडून देण्यात आले. त्यांनी पुन्हा सत्याग्रह मोहिम सुरू केली. शरयूताई धोत्रे आणि दमयंती धर्माधिकारी यांनी १२ खेडयांना भेटी देऊन, जोरदार युध्दविरोधी प्रचार केला, ठिकठिकाणी त्यांनी भाषणे दिली. त्यांच्या भाषणाचा लवकरच परिणाम सुध्दा दिसू लागला. शरयुताई धोत्रे एका कार्यक्रमात म्हणल्या की, हिटलरपेक्षा ब्रिटीश काही कमी क्रूर नाहीत. शरयूताई व दमयंती धोत्रे यांनी वैयक्तिक सत्याग्रहात केलेल्या कार्यामुळे, त्यांना पकडण्यात आले. परंतू काही दिवसांनी त्यांना सोडून देण्यात आले.[२१] मात्र दमयंतीबाई धर्माधिकारी यांना गाओगावी प्रचार केल्याबद्दल ब्रिटीशांनी अटक केली. त्या १९४२ पर्यंत तुरूंगात होत्या.[२२] ९ मे १९४२ रोजी शरयुताई धोत्रे खरांगणा येथे भाषण देतांना म्हणाल्या की, ''महायुध्द'' हे कोणत्याही दृष्टीने भारताच्या फायद्याचे नाही. माझा स्वत:चा ब्रिटीश सरकारच्या शक्ती आणि कार्यक्षमतेवर विश्वास नाही. सरकार जनतेचे संरक्षण करण्यास समर्थ नाही. म्हणून जनतेने आपले संरक्षण करण्यासाठी संरक्षक दलाची स्थापना करावी.[२३]

भारत छोडो आंदोलन :

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात वर्धा शहराचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणारा १९४२ च्या ''भारत छोडो'' चा ठराव, वर्धा शहरात पारित झाला होता. वर्धेजवळील सेवाग्राम येथे महात्मा गांधीजींचे वास्तव्य असल्यामुळे, वर्धा शहर स्वातंत्र्य लढ्याचे केंद्रस्थान बनून भारतातीलच नव्हे, तर परदेशातील मंडळीही गांधीजींना भेटण्यासाठी वर्धेला येत असते.[२४] कस्तुरबा गांधी, जानकीदेवी बजाज आणि जमनालालजी बजाज यांच्या सहकार्यामुळेच वर्धा येथे महिलाश्रमाची स्थापना झाली होती. १९४२ च्या आंदोलनात महिलाश्रमीला महिलांना अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले.[२५]

८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या अधिवेशनात ''चलेजाव'' चळवळीवर शिक्का मोर्तब होताच सर्व महत्त्वपूर्ण पुढाकाऱ्यांना अटक झाली. विनोबा भावे यांना वर्धा येथे पकडण्यात आले वत्यांची रवानगी नागपूरच्या कारागृहात करण्यात आली. नागपूर येथील बातम्या वर्धा शहरात पोहचतात, ''चलेजाव'' चळवळीला जोरात सुरूवात झाली. अल्पावधीत आंदोलनाचे तीव्र स्वरुप धारण केले. चलेजाव चळवळीत शहरातील महिला सुध्दा मागे नव्हत्या.[२६]

वर्धा शहरातील महिला आश्रमातील मुलींनी १९४२ मध्येही प्रचारकार्य सतत चालूच ठेवले होते. प्रमुख पुढाऱ्यांना अटक करण्यात आल्याने, दक्षता म्हणून ९ ऑगस्ट १९४२ रोजी महिला आश्रम ही शिक्षण संस्था बंद करण्यात येऊन, मुलींना घरी जाण्यास सांगण्यात आले. तरीही बऱ्याच मुली व शिक्षक वर्धेलाच राहिले. पालकांनी सुध्दा आपल्या मुलींना चळवळीत भाग घेण्यास परवानगी दिली होती. कायदेशीर जबाबदारी नसली तर, विद्यार्थीनींना मार्गदर्शन संस्थेतील मंडळीच करीत होती.[२७] संपूर्ण ऑगस्ट महिन्यात विद्यार्थीनी व अर्धे विद्यार्थी तुरूंगात गेले. महिला आश्रमाच्या किर्तीला साजेसे असे हे कार्य होते. महिला आश्रमाच्या आचार्या कमलाताई लेले, त्यांचे पती व मालतीताई थत्ते ह्यांना अटक झाल्यानंतरही अनेक महिने पत्रके महिला आश्रमातूनच निघत होती. पोलीसांना मात्र शेवट पर्यंत ह्या गोष्टीचा पत्ता लागला नाही. महिला आश्रमाचे कार्यकर्ते आणि विद्यार्थीनींना विधायक कार्यतही बहूमोल कार्य केले. काही महिला घातपाती कार्यातही सहभागी होत्या. तर त्यातील काही महिला भूमिगत झाल्या. १९४३ मध्ये पकडल्या गेल्यात काही महिला आश्रमाच्या महिलाही होत्या.[२८]

भारतामध्ये १९२० पर्यंत स्त्रियांच्या उध्दारासाठी अनेक चळवळी झाल्या, प्रयत्न झाले. परंतू महात्मा गांधींच्या काळात स्त्रियांनी प्रथमच (सर्व चळवळीत) प्रत्यक्षपणे सामाजिक व राजकीय आंदोलनात पुरुषांच्या बरोबरीने भाग घेतला. गांधीजींच्या काळात भारतीय स्त्रियांनी टाकलेले हे एक ऐतिहासीक पाऊल होते. त्या दृष्टीने दमयंतीबाई धर्माधिकारी यांना अटक झाल्यानंतर त्यांनी कोर्टात दिलेले भाषण स्त्रियांच्या भावना दर्शविणारे होते. दमयंतीबाईनी १९४२ च्या लढयात भाग घेतल्याबद्दल त्यांना अटक झाली होती.

त्या १९४५ पर्यंत तुरुगांत होत्या. वर्धा जिल्ह्यातून स्वातंत्र्य लढ्यात गेलेल्या महिलांची संख्या जवळपास ८० होती. संपूर्ण भारतात तुरुंगात गेलेल्या व्यक्तींच्या आणि महिलांच्या संख्येच्या दृष्टीने हया जिल्ह्याचा नंबर बराच वरचा लागतो.[२९]

निष्कर्ष :

वर्धा शहर भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे शहर होते. गांधीजींनी जमनालाल बजाज हयांच्या विनंतीवरून सेवाग्राम (वर्धा) ला राहण्याचे मान्य करतातच, स्वातंत्र्यलढ्याचे केंद्र सेवाग्राम (वर्धा) बनले. जमनालाल बजाज प्रमाणे त्यांची पत्नी जानकीदेवी बजाज यांनी राष्ट्रीय कार्यात उडी घेऊन, प्रचार कार्याला सुरुवात करताच, वर्धा शहरात जोरदार राष्ट्रीय जागृती घडून, वर्धा शहरातील स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेण्यास सुरुवात केली. जानकीदेवीसह इतर महिलांनी वर्धा शहरासह आजुबाजूच्या परिसरातही प्रचार कार्य करुन, मिरवणूका काढल्या, सभा घेतल्या. त्याचा योग्य परिणाम होऊन वर्धा शहरासह, जिल्ह्यातील, सर्व जाती– धर्माच्या स्त्रियांनी घर सांभाळून, स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेण्यास सुरुवात केली. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून, महात्मा गांधीजींनी केलेया सर्व आंदोलनात त्यांनी उत्सफूर्तपणे भाग घेतला. सर्व वर्गातील स्त्रिया भारतीय राष्ट्रीय आंदोलनात सहभागीच झाल्याच नव्हत्या, तर कित्येक स्त्रियांना ब्रिटीशांनी अटक सुध्दा केली होती. पण त्याचा स्त्रियांचा सहभागावर काहीच परिणाम झाला नाही. वर्धा शहरासह, जिल्ह्यातील महिलांचा हा सहभाग महात्मा गांधी आणि जानकीदेवी बजाज हयांच्या परिवाराने केलेल्या राष्ट्रीय जागृती कार्यामुळेच शक्य झाला होता.

संदर्भ :

१) जमनालाल बजाज : कथनी करनी एकसी ले. संदीप मुकुल उपाध्याय, पृ १९, जमनालाल बजाज जन्म शताब्दी समारोह समिती, प्रकाशन मुंबई.
२) माझी जीवनयात्रा, ले. जानकीदेवी बजाज पृ. ४९, प्रकाशन पाप्युलर बुक डेपो, मुंबई – १९६०
३) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ.४९ मंगेश प्रकाशन, नागपूर– २००३
४) कित्ता : पृ. ५०
५) वर्धा जिल्हा गॅजेटीयर संपादक डॉ. की.का. चौधरी पृ. ८१, प्रकाशन दर्शनिका विभाग म.शा. मुंबई १९९२
६) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. ११४ मंगेश प्रकाशन, नागपूर –२००३
७) कित्ता : पृ. ११५
८) वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास ले. विरेंद्र गोपालसिंह बैस, पृ. ६३
९) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. ११५ मंगेश प्रकाशन, नागपूर – २००३
१०) कित्ता : पृ. ११६
११) कित्ता : पृ. ११७
१२) वर्धा जिल्हा गॅजेटीयर संपादक डॉ. की.का. चौधरी पृ. ८१, प्रकाशन दर्शनिका विभाग म.शा. मुंबई १९९२
१३) PoliceAbstract Book no. 32, Para. no. 92b
१४) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. ११८ मंगेश प्रकाशन, नागपूर– २००३
१५) वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ले. चंद्रशेखर धर्माधीकारी, पृ. ७४ प्रकाशन ऑ.क्रा. समिती मुंबई १९९२
१६) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. १३६ मंगेश प्रकाशन, नागपूर– २००३
१७) वर्धा जिल्हा गॅजेटीयर संपादक डॉ. की.का. चौधरी पृ. ८४, प्रकाशन दर्शनिका विभाग म.शा. मुंबई १९९२
१८) वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास ले. विरेंद्र गोपालसिंह बैस, पृ. ६३, मंगेश प्रकाशन नागपूर २००५
१९) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. १३९ मंगेश प्रकाशन, नागपूर –२००३
२०) स्वातंत्र्य लढयातील स्त्री, ले. तारा धर्माधिकारी, पृ. ५८, ऑ.क्रा. समिती मुंबई १९९२
२१) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. १३९, १४०,१४१ मंगेश प्रकाशन, नागपूर– ००३
२२) वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्यलढा, ले. चंद्रशेखर धर्माधीकारी, पृ. ७२ प्रकाशन ऑ.क्रा. समिती मुंबई १९९२
२३) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. १४१ मंगेश प्रकाशन, नागपूर –२००३
२४) आधुनिक विदर्भाचा इतिहास, ले. डॉ. श.गो. कोलारकर, पृ. १९५, मंगेश प्रकाशन लागपूर, २००३
२५) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. १४१,१४२ मंगेश प्रकाशन, नागपूर–२००३

२६) वर्धा जिल्हयातील स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास ले. विरेंद्र गोपालसिंह बैस, पृ. १०४, मंगेश प्रकाशन नागपूर २००५
२७) वैदर्भिय महिलांचे स्वातंत्र्यसंग्रामातील सहकार्य, ले. दमयंती पाठक, पृ. १७० मंगेश प्रकाशन, नागपूर–२००३
२८) कित्ता : पृ. १७८
२९) स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश भाग १, संपादक न.रा. पाठक, पृ. ७२,७३ प्रकाशन महाराष्ट्र शासन मुंबई १९७६